या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादकः राहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी
नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई
वडवणी केज परळी
पाटोदा शिरूर कासार
धारूर आष्टी माजलगाव
इच्छुकाने संपर्क साधावा

94036 41482

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | गुरुवार २२ ऑगस्ट २०२४ | अंक२५६ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# "My Child Not For Politics", बदलापुरातील त्या घटनेनंतर परिसरात बॅनरबाजी, बॅनरने वेधलं लक्ष

## नेमकं प्रकरण काय?

बदलापुरातील एका नामांकित शाळेत शिकणाऱ्या दोन चिमुकल्यांवर लैंगिक अत्याचार झाला. या घटनेमुळे महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास 12 तास उशीर केल्याचा आरोप केला जात आहे. या घटनेचे तीव्र पडसाद बदलापुरात उमटताना दिसत आहेत. याप्रकरणी मुख्य आरोपीला अटक करण्यात आली आहे. तर शाळेच्या मुख्याध्यापिकेला निलंबित करण्यात आले आहे. या प्रकरणात वरिष्ठ आयपीएस अधिकारी आरती सिंग यांच्या अध्यक्षतेतील एसआयटी गठीत करण्यात आली आहे. तसेच, कर्तव्यात कसूर करणाऱ्या तीन पोलिसांना निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या घटनेत जलदगती न्यायालयात खटला चालवण्यात येणार आहे.




बदलापुरातील दोन शालेय विद्यार्थिनींवर लैंगिक अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेचा बदलापुरात तीव्र निषेध नोंदवण्यात आला. बदलापुरात घडलेल्या या घटनेचे संपूर्ण महाराष्ट्रात पडसाद उमटले. याप्रकरणी आरोपी अक्षय शिंदेला 24 ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. तर दुसरीकडे आता याप्रकरणावरुन राजकारण सुरु झालं आहे. सध्या या प्रकरणावरुन विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये जोरदार आरोप-प्रत्यारोप होताना दिसत आहेत. त्यातच आता बदलापूर परिसरातील एका बॅनरने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले आहे. बदलापुरातील शाळेतील लैंगिक अत्याचार झाल्याच्या घटनेनंतर दोन चिमुकल्या मुलींना न्याय मिळावा या मागणीसाठी संपूर्ण बदलापूरकर रस्त्यावर उतरले. बदलापूरकरांनी बदलापुरातील त्या प्रतिष्ठित शाळेसमोर पालकांनी आंदोलन केले. तर दुसरीकडे हजारोंच्या संख्येने जमलेल्या जमावाने रेल्वे स्थानकावर रेल रोको आंदोलन केले. आता याप्रकरणी बदलापूर स्थानक परिसरात काही बॅनर लावण्यात आले आहेत. My Child Not For Politics, अशा आशयाचे बॅनर सध्या संपूर्ण बदलापुरात झळकत आहेत. badlapur banner बदलापूर स्टेशन परिसरात लावलेल्या या बॅनरवर विकृत राजकारण नको, असा सल्ला देण्यात आला आहे. "बदलापूरकर म्हणून आम्ही त्या दुर्दैवी प्रकाराचा निषेधच करतो. पण त्या दुर्दैवी प्रकरणावर बदलापुरात विकृत राजकारण नको. My Child Not For Politics", असा मजकूर या बॅनरवर लिहिण्यात आला आहे. त्याखाली "एक सजग बदलापूरकर" असेही म्हटले आहे. बदलापूर परिसरात झळकणारे हे बॅनर कोणी लावले, याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. मात्र या बॅनरने सर्वसामान्यांसह राजकीय लोकांचेही




## शिवरायांचा पुतळा पूर्वीच्याच नियोजित जागी बसवा
## पुतळा आणून १४- महिन्यांचा काळ लोटूनही नगर परिषदेला जाग येईना

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**

किनवट : किनवट शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या नवीन पुतळ्यासंदर्भात शिवप्रेमींनी अनेक वेळा शासन दरबारी निवेदन उपोषण करून नवीन पुतळ्याची मागणी अनेक दिवसांपासून प्रलंबित होती.तेव्हा नगरपरिषद व स्थानिक आमदारांनी शिवप्रेमींच्या मागणी संदर्भात छत्रपती शिवरायांचा पुतळा उभारणीचं काम हाती घेऊन पुतळा आणला मात्र पुतळा आणून साधारणता १४ महिन्यांचा कालावधी गेला असून पुतळा बसवण्यासाठी अजून मुहूर्त कसा मिळेना ? बंदिस्त असणाऱ्या छत्रपती शिवरायांचा पुतळा पूर्वीच्याच ठिकाणी नियोजित जागेतवर बसवण्याच्या मागणीसाठी नगरपरिषदे समोर शिवप्रेमी गजानन कोल्हे शाम रावसाहेब मगर चंद्रकांत प्रकाश साळवे हे पुतळ्या बसवण्यासंदर्भात आमरण उपोषणास बसले असून शासनाच्या आदेशानुसार ज्या जागेवर परवानगी दिली आहे त्या जागेवर पुतळ्याचे त्वरित बांधकाम सुरू करावे गेल्या १४ महिन्यापासून महाराजांचा अशारूढ पुतळा किनवट नगरपरिषदच्या देखरेखी खाली ठेवण्यात आला आहे. शिव स्मारकाचे बांधकाम करण्यास संबंधित ठेकेदारास आदेश देऊन कामास सुरुवात करावी या मागणीसाठी २०- ऑगस्ट पासून शिवप्रेमी उपोषणास बसले असून आज उपोषणाचा दुसरा दिवस आहे

## आरक्षण योध्दा मनोज जरांगे पाटील यांची मोहनराव पाटील सिरसाट यांनी घेतली भेट
## लोहा कंधार विधानसभा निवडणुक लढविण्यासठी मोहनराव पाटील सिरसाट इच्छुक

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**



नांदेड : मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावं या मागणीसाठी संघर्ष करत असलेले मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांची नांदेड येथील आम आदमी पार्टी व मराठा समाज बांधवांनी अंतरवाली सराटी येथे भेट घेतली तसेच आगामी काळात होणाऱ्या लोहा कंधार विधानसभा निवडणुकी संदर्भात मोहनराव पाटील सिरसाट यांनी जरांगे पाटील यांच्याशी चर्चा केली. मोहनराव सिरसाट यांनी शेतकरी संघटनेच्या चळवळीत अनेक वर्षे काम करून त्यांनी सरकारच्या विरोधात शेती लुटीचा इतिहास व धरणे आंदोलने रास्तारोको जेलभरो व आम आदमी पार्टी संयोजक म्हणून २०१४ ते २०१७ पर्यंत कार्य केले आहे. मनोज जरांगे पाटील यांच्याकडून आगामी काळात विधानसभेसाठी उमेदवारांची चाचपणी सुरू असून लोहा कंधार मतदारसंघातुन विधानसभा लढविण्यासाठी इच्छूक असून संधी द्यावी अशी मागणी मोहनराव पाटील सिरसाट ज्ञानेश्वर पाटील पांगरीकर, निळकंठ आदमी पार्टी नांदेडच्या वतीने मागणी केली आहे. यावेळी आरक्षण योध्दे मनोज जरांगे पाटील यांनी निवडणूक लढण्याचे ठरले तर आपला विचार आवश्य करू दि.२९ ऑगस्टला आंतरवली येथील बैठकीला उपस्थित रहा त्या बैठकीत विधानसभा निवडणूकी संदर्भात निर्णय होणार आहे. कंधार-लोहा मतदार संघातील सुजान मतदारांनी सर्व सामान्य माणसालाचा आवाज बुलंद करून तसेच राजकारणातील गैरवर्तनी लोकांपासुन कंधार -लोहा मतदारसंघ मुक्तकरण्यासाठी जनतेंनी साथ देऊन घ्यावी परीवर्तन निश्चित घडेल अशी माहिती विधानसभा निवडणुक लढविणारे इच्छुक उमेदवार मोहनराव सिरसाट यांनी सांगितले.

## होमगार्ड अनुशेष पूर्ण करण्यासाठी आजपासून नोंदणी सुरु

**बीड प्रतिनिधी**

हिंगोली :- (प्रतिनिधी) जिल्ह्यातील रिक्त होमगार्ड अनुशेष पूर्ण करण्यासाठी दि. 22 व 23 ऑगस्ट, 2024 रोजी होमगार्ड नोंदणीचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे. दि. 22 ऑगस्ट, 2024 रोजी नाव नोंदणी अर्ज क्रमांक 6 ते 9448 मधील सर्व 1135 महिला व दि. 16 ऑगस्ट, 2024 रोजी रद्द केलेल्या नाव नोंदणीपैकी 01 ते 555 अर्ज क्रमांकाच्या 500 पुरुष उमेदवारांना होमगार्ड नोंदणीसाठी बोलाविण्यात येत आहे. तर दि. 23 ऑगस्ट रोजी 7947 ते 9455 अर्ज क्रमांकाचे पुरुष उमेदवार व दि. 16 ऑगस्ट रोजी रद्द केलेल्या नाव नोंदणी पैकी 556 ते 1106 अर्ज क्रमांकाच्या अशा एकूण 1870 पुरुष उमेदवारांना होमगार्ड नोंदणीसाठी बोलाविण्यात आले आहे. सर्व संबंधित उमेदवारांनी वरील दिलेल्या तारखेस उपस्थित राहून होमगार्ड नोंदणी करुन घ्यावी 23 ऑगस्ट हा शेवटचा दिनांक असून त्यानंतर आलेल्या उमेदवारांना चाचणी करिता कोणतीही संधी दिली जाणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी असे आवाहन अर्चना पाटील, जिल्हा समादेशक होमगार्ड तथा अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांनी एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# खा.बप्पाचा एक फोन मोहीम फत्ते! तीन गावातील शेतकऱ्यांचे दुष्काळी अनुदान बँकेत जमा

**अंबाजोगाई/प्रतिनिधी**

जिल्ह्यातल्या सर्वसामान्य जनतेसह शेतकऱ्यांची कामे तातडीने मार्गी लावा. त्यांची अडवणूक करु नका. प्रशासनातील अधिकारी आपल्या कर्तव्यात कसूर करत असतील तर हे योग्य नाही. जे पद आपल्या मिळाले, ते पद जनतेच्या कामी येणे अपेक्षित आहे. कारण अंबाजोगाई तालुक्यातील काही गावातील शेतकऱ्यांचे दुष्काळी अनुदान त्यांना अद्याप मिळालेले नाही. यासंदर्भात खा.बजरंग सोनवणे यांनी अंबाजोगाई तहसीलदार यांना फोन करून शेतकऱ्यांच्या दुष्काळी अनुदानाचा प्रश्न जिथल्या तिथे मार्गी लावला आहे. त्यामुळे खासदार बप्पांचा एक फोन आणि मोहीम फत्ते. असे म्हणत शेतकऱ्यांनी खा.बजरंग सोनवणे यांचे आभार मानले आहेत.

अंबाजोगाई तालुक्यातील भारज , गित्ता आणि पोखरी येथील शेतकऱ्यांचे दुष्काळी अनुदान त्यांना मिळाले नव्हते.त्यामुळे तेथील काही शेतकऱ्यांनी खा.बजरंग सोनवणे यांच्या अंबाजोगाई येथील संपर्क कार्यालयात अनुदान संदर्भात व्यथा मांडली होती.तसेच खा.बजरंग बप्पा सोनवणे अंबाजोगाई येथील भारज, गित्ता, पोखरी या गावांच्या दौऱ्यावर असतांना येथील काही शेतकऱ्यांनी अनुदान बाबतीत कैफियत मांडली होती. शेतकऱ्यांच्या दुष्काळी अनुदान बाबतीत खा. बजरंग सोनवणे यांनी अंबाजोगाई तहसीलदार यांना फोनद्वारे शेतक-यांच्या अनुदानाबद्दल लवकरात लवकर जमा करण्यासंदर्भात सूचना दिल्या. त्यानंतर तहसीलदार यांनी शेतकऱ्यांच्या खात्यावर



अनुदान जमा करण्यास सुरुवात केली आहे.बीड जिल्ह्याला शेतकरी पुत्र खमक्या खासदार लाभला त्यामुळे सर्व सामान्यांचे कामे जिथल्या तिथे मार्गी लागत आहेत. त्यामुळे खासदार बजरंग सोनवणे यांच्या कामावर जनता जाम खुश आहे. दरम्यान पाटोदा तालुक्यात पावसामुळे अनेक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या नुकसानी संदर्भात तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत मिळवून द्यावी. या मागणीसाठी खासदार बजरंग सोनवणे यांनी दोन दिवसांपूर्वी बीड जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले होते. बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेसह शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी खासदार बजरंग सोनवणे तत्पर असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. अशा लोकभावना व्यक्त होत आहेत.

# लिंबागणेश महसूल मंडळात अतिवृष्टीमुळे नुकसान; पंचनामे करून नुकसान भरपाईची मागणी ; महसूल प्रशासन म्हणते वरून पंचनाम्याचे आदेश नाही तर कृषी विभाग कृषी महोत्सवात व्यस्त :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:- (दि.२१) बीड तालुक्यातील सात महसुली मंडळात अतिवृष्टी झाली असुन लिंबागणेश महसूल मंडळात ९५.३ मि.मि.पाऊस झाल्याची शासन दरबारी नोंद झाली आहे. बीड तालुक्यात १ जुन पासुन समाधानकारक पाऊस असतानाच दोन दिवसांपूर्वी झालेल्या पावसाने शेतातील मका , सोयाबीन आदी पिके पाण्याखाली गेली आहेत तर काही ठिकाणी भुईसपाट झाली आहेत. अस्मानी संकटामुळे हातातोंडाशी आलेला घास हिरावला असुन शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यामुळे महसूल प्रशासनाने तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी महसूल प्रशासन व कृषीविभागाला केली आहे.

हातातोंडाशी आलेला घास हिरावला; पिके भुईसपाट; पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी:- अनिल ढवळे, जनार्दन वाणी, विनायक मोरे



मका पिकांवर उगवल्यापासुनच लष्करी अळीने हल्ला चढवला होता, थेट मक्याच्या भुट्यांमध्येही अळीने पन्नास टक्के दाणे खाऊन टाकले होते मोठ्या प्रमाणावर औषध पाण्याचा खर्च करून जे शेतात तग धरून होते. २ दिवसांच्या पावसाने आडवे होऊन भुईसपाट झाले आहे.शेतात मक्याचे कणसं मातीत लोळत असुन हातातोंडाशी आलेला घास अतिवृष्टीमुळे हिरावला असुन सरकारने पंचनामे करून आम्हाला मदत करावी अशी मागणी लिंबागणेश येथील नुकसान ग्रस्त शेतकरी आनिल ढवळे, जनार्दन वाणी,विनायक मोरे यांनी केली आहे.

आम्ही अडाणी,ई पिक पाहणी आम्हाला नाही कळत:- अनिल ढवळे ( शेतकरी)

मका पिकांमध्ये गुडघाभर पाणी साचले असुन मुळाशी पाणी लागल्याने पिक वायाच जाणार आहे. मी अडाणी माझ्याकडे साधा मोबाईल आहे आणि ई पिक पाहणी म्हणतेत ते काही आम्हाला जमत नाही अशी व्यथा आनिल ढवळे यांनी बोलाऊन दाखवली.

महसूल विभागाचे कर्मचारी म्हणतात पंचनाम्याचे आदेश नाहीत तर कृषी विभाग कर्मचारी कृषी महोत्सवात व्यस्त:- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश महसूल मंडळातील अतिवृष्टीमुळे नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यात यावी यासाठी महसूल प्रशासनाला संपर्क साधला असता तलाठी पोतदार यांनी आम्हाला अजुन पंचनामे करण्याचे वरून आदेश आले नाहीत म्हटले तर मंडळ अधिकारी अशोक डरपे यांनी स्थानिक पातळीवरील तलाठी, ग्रामसेवक,कृषी सहाय्यक यांची गावपातळीवरील कमिटी पंचनामे करेल असे सांगितले तर कृषी विभागातील अधिकारी ,कर्मचारी आजपासून ५ दिवस परळी येथे राज्यस्तरीय कृषी महोत्सवात व्यस्त असल्याचे सांगितले त्यामुळे महसूल आणि कृषी विभागाच्या संयुक्त पथकाने करण्यात येणाऱ्या नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे कधी होणार आणि मदत कधी मिळणार हा सुद्धा एक प्रश्नच आहे.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो.नं.८१८०९२७५७२

# जेष्ठ नागरिकांना तीर्थक्षेत्र यात्रा घडवणारी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना

## या मोफत संधीचा लाभ घेण्याचे आवाहन

**बीड : प्रतिनिधी**

बीड, दि. 20: सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत जेष्ठ नागरीकांना तीर्थ दर्शन यात्रेची मोफत संधी देण्यासाठी 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजन' सुरु करण्यात आली आहे. बीड जिल्हयातील वय वर्ष 60 किंवा त्याहून अधिक वयाचे आहेत त्यांना राज्य आणि भारतातील तीर्थक्षेत्रांना मोफत भेटीची दर्शनाची संधी देण्यासाठी 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना' सुरु करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत राज्यामधील ज्येष्ठ नागरिकांसाठी तीर्थक्षेत्र यात्रा मोफत उपलब्ध करुन देणे, सदर योजनेंतर्गत निर्धारीत तीर्थ स्थळांपैकी एका स्थळाच्या यात्रेकरिता पात्र व्यक्तीला या योजनेचा एकवेळ लाभ घेता येईल तसेच प्रवास खर्चाची कमाल मर्यादा प्रती व्यक्ती रुपये 30.000/- (अक्षरी रुपये तीस हजार) फक्त इतकी राहील जेष्ठ नागरीकांनी योजनेचे माहिती प्राप्त करण्यासाठी व योजनेसंबधी अधिक माहितीसाठी डॉ. बाबासाहेव आंबेडकर, सामाजिक न्याय भवन बीड या कार्यालयाशी संपर्क साधावा व जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण बीड यांनी केले आहे.

योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

योजनेच्या लाभासाठी दि. ३१.०१०२०२४ पूर्वी ऑफलाईन अर्ज तदनंतर ऑनलाईन अर्ज,लाभार्थ्यांचे आधारकार्ड / रेशन कार्ड, महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र / महाराष्ट्र राज्यातील जन्म दाखला. लाभार्थ्यांचे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर त्याऐवजी त्या लाभार्थ्यांचे 15 वर्षाचे रेशनकार्ड तथा ओळखपत्र, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, जन्म दाखला या चारपैकी कोणतेही ओळख धरण्यात येईल ),सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुंटूब प्रमुखाचा उत्पन्नाचा दाखला, (वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाखापर्यंत असणे अनिवार्य) किवा पिवळे / केशरी रेशनकार्ड,वैद्यकीय प्रमाणपत्र,पासपोर्ट आकाराचा फोटो, जवळच्या नातेवाईकाचा मोबाईल क्रमांक, सदर योजनेच्या अटी शर्तीचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र ही कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.



बीड : परळी येथे कृषी महोत्सवानिमित्त आलेले राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, आमदार प्रकाश सोळंके, जिल्हाध्यक्ष ॲड. राजेश्वर चव्हाण यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# अमृतच्या लक्षित गटातील युवकांना मिळणार MKCL संस्थेमार्फत

## संगणक कौशल्य विकास प्रशिक्षण

बीड, दि. 20 : महाराष्ट्रातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील युवकांना कोणताही विभाग / संस्था अथवा महामंडळ यांचे मार्फत लाभ मिळत नाही, अशा युवकांना संगणक कौशल्या विकसित व प्रशिक्षित बनण्यासाठी आवश्यक कौशल्य, ज्ञान आणि पाठबळ देऊन त्यांना सक्षम करणे आणि उद्योगाभिमुख रोजगाराच्या आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून स्वावलंबनाला चालना देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. त्या अनुषंगाने दि. 16 ऑगस्ट 2024 रोजी 'अमृत' आणि MKCLयांच्यामध्ये महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आलाआहे.

या करारा अंतर्गत MKCL मार्फत राबविण्यात येणाऱ्या काही निवडक प्रशिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना निवड झाल्यावर लाभ देण्यात येईल. 'अमृत' तर्फे प्रशिक्षणसाठी निवड झालेल्या युवकांना MKCL च्या नियमानुसार सुरुवातीस सुरक्षा शुल्क स्वतः भरावयाचे आहे. योजनेच्या पात्र लाभार्थीनी प्रशिक्षण पूर्ण केल्यावर त्या प्रशिक्षणाचे शैक्षणिक शुल्क अमृत संस्थेमार्फत MKCL संस्थेस परस्पर दिले जाईल. यासंबंधी सर्व माहिती अमृतच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येईल. या सामंजस्य कराराच्यावेळी MKCL च्या व्यवस्थापकीय संचालक वीणा कामत, संयुक्त व्यवस्थापकीय संचालक समिर पांडे, वरिष्ठ महाव्यवस्थापक अमित रानडे, उप महाव्यवस्थापक डॉ. पाटेकर आणि अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी, विशेष कार्यकारी अधिकारी उदय लोकापल्ली तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश वाघचौरे उपस्थित होते. अमृतच्या लक्षित गटातील जास्तीत जास्त तरुणांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले

# राजुरी (न.) येथे आरोग्य शिबिरात १ हजार २९७ रुग्णांची तपासणी; ८४७ चष्मे वाटप

**बीड (प्रतिनिधी)**

दि.१४ : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून विधानसभा मतदारसंघात ग्रामीण भागात सर्कलनिहाय मोफत आरोग्य शिबिर घेतले जात आहे. तालुक्यातील राजुरी (न.) येथे झालेल्या आरोग्य शिबिरात १ हजार २९७ रुग्णांची तपासणी केली असून त्यात ८४७ नेत्ररुग्णांना चष्मे वाटप



केले. तसेच, ६८ जणांची शस्त्रक्रिया केली जाणार आहे. बीड तालुक्यातील राजुरी न. येथील गणपती मंदिरात आरोग्य शिबिराचे उद्घाटन डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. या आरोग्य शिबिरात रुग्णांची ब्लड प्रेशर, शुगर, हृदय, ईसीजी तपासणी करून ठराविक औषधे मोफत देण्यात आली. डोळे तपासणीनंतर ८४७ रुग्णांना मोफत चष्मे देण्यात आले. आवश्यकतेनुसार सोयीसुविधायुक्त रुग्णालयांमध्ये शस्त्रक्रिया मोफत करून दिल्या जाणार आहेत, अशी माहिती डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार, रुग्णांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# शेतकरी बांधवांनी परळी वैजनाथ राज्यस्तरीय कृषी महोत्सवास भेट देण्याचे आवाहन

**बीड प्रतिनिधी):-**

बीड, दि. 20 : बदलत्या परिस्थितीत शेतक-यांना उत्पादन वाढीसाठी प्रोत्साहन देण्यास अनन्यसाधारण महत्व आहे. प्रयोगशील व प्रगतीशील शेतक-यांचे माध्यमातुन शेतक-यांना आपआपसातील विचारांची देवाणघेवाण करण्यास व्यासपीठ उपलब्ध करुन दिल्यास त्यांच्यातील आत्मविश्वास वृध्दींगत होऊ शकतो. आधुनिक कृषि तंत्रज्ञानाचा शाश्वत पध्दतीने अवलंब केल्यास शेतकरी आर्थिक दृष्ट्या उन्नत होऊन जागतिक पातळीवरील स्पर्धाक्षम वातावरणात आपले स्थान सिध्द करु शकतील. याकरीता धनंजय मुंडे, मंत्री कृषी, महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतून व प्रमुख मार्गदर्शनाखाली दि. 21 ते 25 ऑगस्ट 2024 या कालावधीतपरळी वैजनाथ येथे राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटनप्रसंगी एकनाथ शिंदे (मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य), शिवराजसिंह चौहान (मंत्री, कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार),देवेंद्र फडणवीस (उपमुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य) अजित पवार (उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य), धनंजय मुंडे (मंत्री, कृषी, महाराष्ट्र राज्य तथा, पालकमंत्री बीड जिल्हा), संजय बनसोडे, ( मंत्री, क्रीडा व युवक कल्याण बंदरे,महाराष्ट्र राज्य) यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

याशिवाय इतर संसद सदस्य, विधान परिषद सदस्य, विधानसभा सदस्य महोदय व विविध विभागाचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

राज्यातील शेतकऱ्यांची शाश्वत प्रगती व्हावी, कृषि विषयक विकसीत तंत्रज्ञान शेतक-यांपर्यंत पोहोचावे, शासकीय योजनांची माहिती शेतक-यापर्यंत पोहोचावी, शेतकरी ते ग्राहक थेट विक्री श्रृंखला विकसीत व्हावी व शेतमालाला चांगला बाजार भाव मिळावा तसेच शेतकरी व वरिष्ठ कृषी शास्त्रज्ञ यांच्यामध्ये थेट संवाद व्हावा म्हणून या प्रदर्शनात 400 पेक्षा जास्त दालने लावण्यात येणार आहेत. तसेच परिसंवाद, राज्यातील सर्व कृषी विद्यापीठाची दालने, विविध संशोधन केंद्र, कृषी विज्ञान केंद्र, प्रक्रिया उद्योग यांचे विशेष सादरीकरण होणार आहे. सदरील पाच दिवसाच्या कालावधीमध्ये पौष्टीक तृणधान्य महोत्सव, सेंद्रीय शेती दालन, खरेदीदार विक्रेता संमेलन, पशू प्रदर्शन,ड्रोन द्वारे फवारणी प्रात्यक्षिक, रानभाजी महोस्तव, धान्य व इतर शेतीमाल प्रदर्शन व विक्री, शेती निगडीत औजारे खरेदी विक्री दालन व कृषि उत्पादने, स्वयं सहाय्य महिला बचत गट निर्मित वस्तू /पदार्थ विक्री भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहे.

महोत्सवात पाच लाखापेक्षा जास्त शेतकरी भेट देतील असे नियोजन करण्यात आलेले आहे. मानवी आरोग्यामध्ये सकस अन्नाचे अनन्य साधारण महत्व आहे. सकस अन्नामध्ये विविध भाज्यांचा समावेश असतो. रानातील म्हणजेच जंगलातील तसेच शेतशिवारातील नैसर्गिकरित्या उगवल्या जाणाऱ्या रानभाज्या, फळभाज्या, कंदभाज्यांमध्ये विविध प्रकारचे शरिराला आवश्यक असणारे पौष्टिक अन्नघटक व औषधी गुणधर्म असतात. तसेच सदर रानभाज्या नैसर्गिकरित्या येत असल्यामुळे त्यावर रासायनिक किटकनाशक / बुरशीनाशक फवारणी करण्यात येत नाही. त्यामुळे पुर्णपणे नैसर्गिक असल्याने या संपत्तीचा योग्य वापर करणे आवश्यक आहे. त्यांचे आरोग्य विषयक महत्व व माहिती जास्तीत जास्त ग्रामिण तसेच शहरी भागातील नागरिकांना होणेसाठी व विक्री व्यवस्था करुन रानभाज्यांच्या विक्रीतून शेतकऱ्यांनाही काही आर्थिक फायदा होणेसाठी लोकांमध्ये याबाबत जनजागृती करणेसाठी रानभाज्यांचे प्रदर्शन देखील या कृषी महोत्सवामध्ये आयोजित करण्यात आले आहे.

या महोत्सवात कृषी संलग्न विभागांचाही सक्रिय सहभाग असणार आहे.तरी राज्यातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी कृषी महोत्सवास भेट देऊन लाभ घेण्याचे आवाहन ,महाराष्ट्र राज्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे, यांनी राज्यातील शेतकरी बांधवाना केलेले आहे. रविंद्र बिनवडे भा प्र से, तसेच दिपाली कदम, अश्विनी भोपळे, अशोक किरनळ्ळी आयुक्त, कृषि बी टी एम उपसंचालक आत्मा (सामेती) कृषि संचालक (आत्मा) महाराष्ट्र राज्य, पुणे आदि यात सहभागी होणार आहेत.

# कायम मदतीला धावून येणाऱ्या ओमप्रकाश गिरींना राखी बांधण्यासाठी घरेलू कामगार महिलांची गर्दी

**बीड, प्रतिनिधी:-** तळागाळातील महिलांचे प्रश्न सोडवण्यासाठी सतत प्रयत्नशील असलेल्या ओमप्रकश गिरी यांच्या सोबत शेकडो घरेलू कामगार महिलांनी रक्षा बंधन सन साजरा केला. गिरी हे मुख्यमंत्री लाडकी बहीन योजनेचे भाजपाचे राज्य सहप्रभारी आहेत. महिलांना त्यांचे न्याय, हक्क मिळवुन देण्यासाठी ते सतत प्रयत्नशिल असतात. महिलांच्या प्रश्नांचा ते शासन आणि प्रशासन दरबारी पाठपुरावा देखील करतात. यामुळे ते तळागाळातील बहीनींचे लाडके भाऊ बनले आहेत. राजकारण आणि समाजकारण सारेच करतात. परंतु तळागाळातील आणि वंचित उपेक्षीत लोकांसाठी कोणी स्वत: पुढाकार घेऊन काम करत नाही. बाल कामगार प्रकल्प अधिकारी म्हणून अनेकवर्ष बालकांना कामा ऐवजी शिक्षणाच्या प्रवाहात आणारे ओमप्रकाश गिरी हे सध्या मुख्यमंत्री लाडकी बहीन योजनेचे राज्य सहप्रभारी तथा कामगार मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आहेत. तळागाळातील महिलांसाठी ते करत असलेले काम अन् त्यांचे योगदान पाहुन भाजपाने त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवली आहे. या माध्यमातुन धुनी- भांडी, झाड- लोट, रुग्णालय अन् विविध ऑफिस अथवा दुकानातील साफ- सफाई करणाऱ्या महिलांचे संघटन करून त्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्याचे काम ओमप्रकाश गिरी हे करतात. गिरी यांनी आजपर्यंत हजारो घरेलू कामगार महिलांना विविध योजनांचा लाभ मिळवून दिला आहे. सतत त्यांच्या बैठका, मार्गदर्शन असे कार्यक्रम घेऊन महिलांना जागृत करून त्यांचे मोठे संघटन देखील त्यांनी तयार केले आहे. विविध जाती- धर्मातील माता- भगीनींसाठी सतत कार्यरत असलेल्या ओमप्रकाश गिरी नावाच्या भावाला पवित्र नात्याचा सन असलेल्या रक्षाबंधन सना दिवशी राखीच्या माध्यमातून पवित्र नात्याची रेशीमगाठ बांधण्यासाठी शेकडो घरेलू कामगार महिलांनी गर्दी केली होती. यावेळी ओमप्रकाश गिरी यांनी, तळागाळातील माझ्या बहीनी समोर अनेक प्रश्न आहेत. त्यांना खुप संघर्ष करावा लागत आहे. परंतु माझी एकही घरेलू कामगार बहीन तिच्या हक्क आणि न्यायापासून वंचीत राहणार नाही, असा विश्वास गिरी यांनी केला.

फोटो- बीड : शेकडो घरेलू कामगार महिलांनी ओमप्रकाश गिरी यांना राखी बांधून अडचणीत मदतीला धावून येणाऱ्या भावासोबत रक्षाबंधन सन साजरा केला.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेसाठी

## युवकांनी जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा :- कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई,दि.२१: सर्वाधिक रोजगार देणारे शहर मुंबई असून योग्य प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध झाल्यास जास्तीत-जास्त रोजगार निर्माण होतील. आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र महाविद्यालयात सुरू करण्यासाठी मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांनी मागणी नोंदवावी. तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेसाठी जास्तीत-जास्त रोजगाराची मागणी नोंदवावी, असे आवाहन कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी केले.

आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र व मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना अंमलबजावणी संदर्भात मुंबई विद्यापीठाच्या कलिना कॅम्पस येथील ग्रीन टेक्नॉलॉजी सभागृहात आयोजित बैठकीच्या उद्घाटन प्रसंगी कौशल्य विकास मंत्री लोढा बोलत होते. मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, मुंबई



विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रविंद्र कुलकर्णी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल सोनवणे, मुंबई उपनगरचे जिल्हा कौशल्य विकास अधिकारी रवींद्र सुरवसे, मुंबई शहरचे जिल्हा कौशल्य विकास अधिकारी संदीप गायकवाड यावेळी उपस्थित होते.

मंत्री श्री. लोढा म्हणाले की, शिक्षणासोबत योग्य कौशल्य प्रशिक्षण दिल्यास अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. उद्योग जगताला आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ पुरवण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. शासन, उद्योजक व अशासकीय सर्व संस्था यांच्या मदतीने आपण कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. शासनाने रोजगार निर्मितीसाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना आणली आहे. तसेच विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य वाढीस लागावे यासाठी आचार्य चाणक्य कौशल्य विकासकेंद्र देखील सुरू केलेले आहेत. राज्यात एक हजार आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र सुरू करण्यात येणार असून यामध्ये प्रत्येक महाविद्यालयात एक कौशल्य विकास केंद्र सुरू करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. या केंद्रांसाठी मुंबई शहर आणि मुंबई उपनगर मधून शंभर टक्के केंद्रांची मागणी नोंदवावी. तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणासाठी जास्तीत-जास्त रोजगाराची मागणी नोंदवावी. उद्योजकांनी तसेच खाजगी आस्थापनांनी आपली रोजगाराची मागणी नोंदवावी असेही मंत्री श्री. लोढा यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी श्री. क्षीरसागर म्हणाले की, भारत हा सर्वाधिक युवांची संख्या अधिक असलेला देश आहे. भारताची लोकसंख्या हेच सध्या बलस्थान आहे. प्रत्येक युवक युवतीला काळानुरूप कौशल्य विकास करून जास्तीत-जास्त रोजगाराच्या संधी निर्माण होतील, यासाठी शासन प्रयत्न करत आहे. प्रत्येक महाविद्यालयाने आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र स्थापन करून पदवी सोबतच काळानुरूप कौशल्य युवांना शिकवावेत. कौशल्य विकास विभागाच्या दोन्ही योजना पूरक असून या दोन्ही योजनेमध्ये प्रत्येक महाविद्यालयाने तसेच उद्योजकांनी, विविध आस्थापनांनी आपली मागणी नोंदवावी असे आवाहन यावेळी जिल्हाधिकारी यांनी केले.

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल सोनवणे यांनी प्रास्ताविक केले. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी कौशल्य अभियान अधिकारी विनय काटोलकर यांनी सूत्रसंचालन केले. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.रवींद्र कुलकर्णी यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले.

## निवासी डॉक्टर संघटनांनी पुकारलेल्या संपाला जे.ज.हॉस्पिटल तृतीय श्रेणी संघटनेचा जाहीर पाठिंबा



मुंबई : ९ ऑगष्ट २०२४ रोजी कोलकत्ता येथील आर.जी.कर. मेडिकल कॉलेजमध्ये, घडलेल्या घटनेत एका महिला डॉक्टरवर क्रूरपणे बलात्कार करून तिची हत्या करण्यात आली. या अत्यंत नींदनीय व लंछनास्पद घटनेमुळे वैद्यकीय क्षेत्रात मोठा धक्का बसला आहे व तसेच मध्यरात्री १५ ऑगस्ट रोजी आंदोलन विद्यार्थ्यांवर हल्ला करण्यात आला त्याच्या Central MARD या निवासी डॉक्टर संघटनेनी पुकारलेल्या संपामध्ये जे.जे. हॉस्पिटल मधील तृतीय श्रेणी संघटनेचा जाहीर पाठिंबा व्यक्त करण्यात आला. पाठिंबा पत्र जे.जे. हॉस्पिटल मार्ड संघटनेचे अध्यक्ष डॉ. संपत सूर्यवंशी, व मध्यवर्ती मार्ड संघटनेचे अध्यक्ष डॉ. प्रतीक देबाजे, महासचिव डॉ. आदिती कानडे, उपाध्यक्ष डॉ. अक्षय नलावडे, डॉ. प्रणय खेडकर, डॉ. अक्षय बोडके, व डॉ. दस्तागीर जमादार हे सर्व मार्ड संघटनेच्या पदाधिकारी यांच्याकडे तृतीय श्रेणी संघटनेचे अध्यक्ष सुरेश तांबे व सरचिटणीस अरुण जाधव यांनी दिले. याबद्दल मार्ड संघटनेचे पदधिकारी यांनी आभार मानले.

# राज्यस्तरीय कृषि महोत्सव चे दिमाखदार उद्घाटन

## आता राज्यात लाडका शेतकरी अभियान -मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सोयाबीन, कापूस अनुदानासाठी ई-पीक पाहणीची अट रद्द

बीड, दि. 21 : लाडकी बहीण व लाडका भाऊ नंतर आता आपला अन्नदाता असणाऱ्या शेतकऱ्याच्या लाभाच्या सर्व योजना राबवून लाडका शेतकरी अभियान राज्यात सुरु करण्यासोबतच सोयाबीन व कापसाला हेक्टरी पाच हजार रुपये मदत देण्यातील ई पिक पाहणीची अट रद्द करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज परळी वैजनाथ येथील राज्यस्तरीय कृषि महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी केली. परळी येथील स्व. पंडीतअण्णा मुंडे सभामंडप कृषि उत्पन्न बाजार समिती येथे एका दिमाखदार सोहळ्यात पाच दिवसीय कृषि महोत्सव २०२४ चे उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास केंद्रीय कृषि व शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमास व्यासपीठावर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार, राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे, राज्य कृषि मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल तसेच विधानपरिषद सदस्या आमदार पंकजा मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते रिमोटद्वारे नमो शेतकरी महासन्मान योजनेचा चौथा हप्ता राज्यातील शेतकऱ्यांच्या खात्यात डीबीटीद्वारे जमा करण्यात आला. तसेच सोयाबीन, कापूस उत्पादक शेतकऱ्यांना पाच हजार रुपये अनुदान वितरीत करण्यासाठी वेबपोर्टलही मान्यवरांच्या हस्ते कार्यान्वित करण्यात आले. कृषि विभागाच्या विविध योजनांच्या माहितीचा समावेश असलेल्या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन करण्यात आले. यासोबतच परभणी येथील वसंतराव नाईक कृषि विद्यापीठाने तयार केलेल्या एकात्मिक कीड रोग व्यवस्थापन पुस्तिकेचेही यावेळी प्रकाशन करण्यात आले. पाच दिवसीय चालणाऱ्या या कृषि महोत्सवात कृषि साहित्य प्रदर्शनासोबतच पशुप्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत येणाऱ्या पाच दिवसात विविध विषयांवर परिसंवाद, चर्चासत्र होणार आहे. तसेच याठिकाणी धान्य महोत्सव, रानभाजी महोत्सव होणार आहे. प्रदर्शनात महिला बचतगटांसाठी साहित्य विक्रीची दालने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. कृषि अवजारांचा स्वतंत्र विभाग देखील याठिकाणी आहे. या पाच दिवसीय महोत्सवाला किमान पाच लाख शेतकरी भेट देण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. राज्यातील सरकार हे शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देणारे असून आतापर्यंत नैसर्गिक आपत्तीच्या काळात हे सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले आहे. एनडीआरएफचे निकष बाजूला ठेवून दुप्पट नुकसानभरपाई देण्याचा निर्णय शासनाने घेतला. गतवर्षी सोयाबीन, कापूस पिकाला कमी दर मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रति हेक्टरी पाच हजार रुपये देण्याचा निर्णय शासनाने घेतला. यासाठी आवश्यक ई-पीक पाहणी अहवाल अनेक शेतकऱ्यांकडे उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले असल्याने आता ई-पीक पाहणी अहवालाची अट शिथिल करून सातबारा उताऱ्यावरील नोंदीनुसार अनुदान वाटप करण्यात येईल, असे मुख्यमंत्री म्हणाले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. यासोबतच लाडक्या भावांना विद्यावेतन देण्यासाठी शासनाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना आणली. आता याच धर्तीवर विविध लाभांच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी लाडका शेतकरी अभियान सुरु करण्याची घोषणा मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केली. याची सुरुवात आज नमो शेतकरी महासन्मान योजनेचा दोन हजार रुपयांचा चौथा हप्ता शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करून होत असल्याचे त्यांनी सांगीतले. शेतकऱ्यांना केवळ १ रुपया विमा हप्ता भरून प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा लाभ देणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य असून साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषिपंपांना मोफत वीज देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. ‘कष्टकरी, वारकरी आणि सुखी शेतकरी’ हेच शासनाचे धोरण असून राज्यातील कांदा, सोयाबीन, कापूस आणि दुधाला योग्य मिळवून देण्यासाठी केंद्र आणि राज्य शासन प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. माझी लाडकी बहीण योजनेमुळे महिलांच्या सक्षमीकरणामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळणार असून ही योजना कायमस्वरूपी सुरु राहणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. तसेच कृषि क्षेत्रातील नवीन बदलांची माहिती शेतकऱ्यांना मिळण्यासाठी, आधुनिक शेतीला चालना मिळून राज्यातील कृषि क्षेत्राचा विकास होण्यासाठी कृषि महोत्सव उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारी आणि त्यांना सन्मान मिळवून देणारी असल्याचे नमूद करून ही योजना सुरु केल्याबद्दल केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी राज्य शासनाचे अभिनंदन केले. राज्यातील शेतकऱ्यांना केंद्रात न्याय मिळवून दिला जाईल, असे सांगून ते म्हणाले की, केवळ १ रुपयात प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ देणारे आणि प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या धर्तीवर नमो शेतकरी महासन्मान योजना राबवून शेतकऱ्यांना दरवर्षी सहा हजार रुपये देणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी प्रयत्नशील आहे. महाराष्ट्रातील सोयाबीन, कापूस आणि कांदा उत्पादक शेतकऱ्यांना शेतमालाचा योग्य दर मिळवून देण्यासाठी केंद्र व राज्य शासन सकारात्मक निर्णय घेईल, असे कृषिमंत्री श्री. चौहान म्हणाले. मराठवाड्यातील दुष्काळ दूर करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. समुद्रात वाहून जाणारे ५० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतची योजना अंतिम टप्प्यात असून बीड जिल्ह्यातील



आष्टीपर्यंत लवकरच हे पाणी येईल. यासाठी मराठवाड्याचे हक्काचे पाणी मराठवाड्यात आणण्यासाठी सुमारे ११ हजार कोटींची कृष्णा-भीमा स्थिरीकरण योजना हाती घेण्यात आली आहे. ११ सिंचन प्रकल्पांसाठी १३ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तसेच नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पातून शेतकऱ्यांना विविध बाबींचा लाभ देण्यासाठी ६ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. तसेच जायकवाडी प्रकल्पाच्या टप्पा-२ साठी ५३६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून माजलगाव कालव्याचे काम हाती घेण्यात आले आहे. यामुळे मराठवाड्यातील ८५ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. त्यामुळे मराठवाड्याचा सिंचनाचा अनुशेष दूर होवून शेतकऱ्यांना सिंचनाची सुविधा उपलब्ध होईल, असे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महिलांच्या सक्षमीकरणासाठी गती देणारी ठरेल असे त्यांनी सांगितले. सर्वसामान्य गरीब नागरिक हा केंद्रबिंदू मानून राज्य शासन विविध योजनाची प्रभावी अंमलबजावणी करीत आहे. त्यानुसार राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून जवळपास सव्वाकोटी माता-माउलींच्या खात्यात योजनेची रक्कम जमा करण्यात आली आहे. तसेच गरीब कुटुंबातील मुलींना मोफत व्यावसायिक शिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेतून महिलांना दरवर्षी तीन मोफत गॅस सिलेंडर मोफत देण्यात येणार आहेत. त्यामुळे ५२ लाख कुटुंबांना लाभ होणार आहे. सुमारे ४४ लाख शेतकऱ्यांना मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजनेचा लाभ मिळणार असून शेतकऱ्यांना साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषिपंपांना मोफत वीज मिळेल, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. तसेच अवर्षणप्रवण भाग असलेल्या मराठवाड्यातील शेतकऱ्यांना पाच दिवसीय राज्यस्तरीय कृषि महोत्सवात शेतीतील नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळणार असून त्यांचे उत्पन्न वाढीसाठी हा महोत्सव उपयुक्त ठरेल, असे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांना कृषि क्षेत्रात होत असलेल्या क्रांतीची, नवीन बदलांची माहिती मिळावी, यासाठी कृषि विभागाने राज्यस्तरीय कृषि महोत्सवाचे आयोजन केले आहे. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च करून त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार केला जात आहे. ड्रोनद्वारे फवारणी, नॅनो युरिया, नॅनो डीएपी वापराबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती केली जात आहे. यामुळे भविष्यात शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्च जवळपास ३० टक्केने कमी होवून उत्पन्नात २० टक्के वाढ होईल, असा विश्वास राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केला. विधानपरिषद सदस्य पंकजा मुंडे यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविकामध्ये कृषि आयुक्त रवींद्र बिनवडे यांनी राज्यस्तरीय कृषि महोत्सवाबाबत माहिती दिली. पाच दिवसीय कृषि महोत्सवात शेतकऱ्यांना नवनवीन प्रयोगांची माहिती देण्यासाठी चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले असून ४०० पेक्षा अधिक दालनांतून शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञान, प्रयोगांची माहिती दिली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रारंभी महिला आणि शेतकऱ्यांच्यावतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मान्यवरांचा एकत्रित हार घालून सत्कार करण्यात आला. तसेच बैलबंडी भेट देण्यात आली. या कार्यक्रमास व्यासपीठावर आमदार विक्रम काळे, आमदार प्रकाश सोळंके, आमदार नमिता मुंदडा, आमदार बाळासाहेब आजबे, माजी आमदार टी.आर. जिजा पाटील, माजी आमदार सुरेश धस, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संगीतादेवी पाटील यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन क्षिप्रा मानकर यांनी केले, आत्माचे प्रकल्प संचालक सुभाष साळवे यांनी आभार मानले.

हेलिपॅडवर स्वागत

कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथींचे येथील थर्मल कॉलनी हेलिपॅडवर आगमन झाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे स्वागत पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केले. प्रशासनातर्फे विभागीय आयुक्त दिलीप गावडे आणि जिल्हाधिकारी अविनाश पाठक, पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी मुख्यमंत्र्यांचे स्वागत केले. यावेळी त्यांनी पोलीस दलातर्फे मानवंदना देण्यात आली. तत्पूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे एकाच हेलिकॉप्टरने आगमन झाले. त्यांच्यासमवेत आमदार पंकजा मुंडे या देखील होत्या. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांचेही हेलिपॅडवर प्रशासनातर्फे स्वागत करण्यात आले.

*****

दैनिक **लोकआरंभ** लोकक्रांतीचा आरंभ

गुरुवार २२ ऑगस्ट २०२४



या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

# MPSC विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी शरद पवार मैदानात; थोड्याच वेळात आंदोलनात सहभागी होणार

**बीड । प्रतिनिधी**

मागच्या तीन दिवसांपासून एमपीएससीचे विद्यार्थी आंदोलन करत आहेत. परवा दिवशी रात्रीपासून हे विद्यार्थी पुण्यातील शास्त्री रोडवर आंदोलन करत आहेत. राज्यसेवा आयोग आणि आयबीपीएसचा परिक्षा एकाच दिवशी असल्याने त्याची तारीख बदलण्यात यावी तसंच कृषी विभागाच्या जागा राज्यसेवा आयोगात समाविष्ट करण्याची मागणी या विद्यार्थ्यांची आहे. पवार दिवशी संध्याकाळच्या सुमारास हे आंदोलन सुरु झालं. मागण्या मान्य होत नाहीत तोवर आंदोलन मागे घेणार नाही, अशी भूमिका आंदोलक विद्यार्थ्यांनी घेतली आहे. विद्यार्थ्यांच्या मागण्या पूर्ण झाल्या नाहीत तर आंदोलनात सहभागी होण्याचा इशारा शरद पवारांनी दिला आहे. ते आज या आंदोलनस्थळी भेट देणार आहेत. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार हे या आंदोलनात सहभागी झालेत.शरद पवार काय म्हणाले?शरद पवार यांनी ट्विट करत या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. विद्यार्थ्यांच्या आंदोलनात शरद पवार सहभागी होणार आहेत. पुण्यात एमपीएससीच्या विद्यार्थ्यांनी पुकारलेल्या आंदोलनासंदर्भात विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करणं सरकारचं कर्तव्य आहे. परंतु सत्ताधारी याला गांभीर्याने घेताना दिसत नाहीत. उद्यापर्यंत यावर सरकारने योग्य भूमिका स्पष्ट केली नाही तर पुण्याच्या आंदोलनस्थळी मी स्वतः आंदोलनात सहभागी होऊन विद्यार्थ्यांना न्याय मिळवण्यासाठी मैदानात उतरणार, असं ट्विट शरद पवारांनी केलं आहे. एमपीएससी आयोगाची आज बैठक पुण्यात सुरु असलेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर एमपीएससी आयोगाने आज बैठक बोलावली आहे. आज सकाळी 10 वाजता मुंबईत ही बैठक होणार आहे. एमपीएससी आयोग 25 तारखेची परीक्षा पुढे ढकलणार की वेळेतच परीक्षा होणार हे आज ठरणार आहे. परवा रात्रीपासून पुण्यात एमपीएससीच्या विद्यार्थ्यांचं आंदोलन सुरु आहे. राजकीय पक्षांचं समर्थन आंदोलनाला मिळतंय. शरद पवारांनीही या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. विद्यार्थ्यांच्या मागण्या काय आहेत? एमपीएससी विद्यार्थ्यांचे गेल्या तीन दिवसांपासून आंदोलन सुरु आहे. राज्यसेवा आयोग आणि आयबीपीएसचा एकाच दिवशी पेपर आल्याने यातील एका पेपरची तारीख बदलण्यात यावी अशी आंदोलक विद्यार्थ्यांची मागणी आहे. कृषी विभागाच्या जागा राज्यसेवा आयोगात समाविष्ट करण्याची मागणी या आंदोलनातून करण्यात येत आहे. तर आज याबाबत तोडगा निघाला नाही तर आंदोलनात सहभागी होण्याचा इशारा शरद पवारांनी दिला आहे.





## बीडमध्ये निखिल काळेची व्हॉटस्ॲप स्टेटस ठेवून आत्महत्या

(बीड प्रतिनिधी) येथील निखील काळे या तरूणाने व्हॉटस्ॲपला स्टेटस ठेवून आत्महत्या केल्याची घटना मध्यरात्रीच्या सुमारास घडली. सकाळी जेंव्हा निखील गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आल्याचे घरच्यांनी पाहीले तेंव्हा सर्वजण हादरून गेले. बार्शी नाक्यावरील तरूण निखील दत्तात्रय काळे या तरुणाने आत्महत्या करण्यापूर्वी रात्री अकरा वाजता व्हाङ्घअपला enjoy every moment everyday is last day in life, enjoy this moment any expected असे व्हाङ्घअप स्टेटस ठेवून गळफास घेऊन जीवन संपवले. एक वर्षापूर्वीच या तरुणाच्या वडिलाचे हृदयविकाराच्या तीव्र झटका आल्याने वडिलांचे निधन झाले होते,तेव्हापासून निखिल ने घरची सर्व जबाबदारी घेऊन योग्यरित्या पार पाडत होता,त्यामुळे घरातीलच कर्त्या तरुणाने जीवन संपवल्याने हळहळ व्यक्त करत असून,आत्महत्याचे कारण समजू शकले नाही.आपल्या जवळचा मित्र अचानक सोडून गेल्याने मित्रपरिवारवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## ॲड.नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांचा आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघात दौरा सुरु.

### आगामी काळात महाराष्ट्रभर होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीसाठी जवळजवळ सर्वच पक्षांच्या यंत्रणा कामाला लागलेल्या दिसत आहेत.

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील सर्वात मोठा आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघात युती आणि आघाडी मध्ये बऱ्याचश्या इच्छुक उमेदवारांची धावपळ चालू असताना दिसत आहे. यामध्ये पाटोदा तालुक्याचे भूमिपुत्र उच्च न्यायालय औरंगाबाद वकील संघाचे मा. अध्यक्ष ॲड.नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांची रा.कॉं. पा.शरद पवार पक्षाकडून उमेदवारीची जोरदार चर्चा सुरू असताना त्यांनी गावभेट दौऱ्या सुरवात केलेली दिसत आहेत. नुकताच त्यांनी येवलवाडी,पारनेर, कुटेवाडी, शिखरवाडी, धनगरजवळका, तांबाराजुरी, उंबरविहिरा, गरमाथा, डोंगरकिन्ही, जाधववाडी,करेगाव, रोहतवाडी, डोंबरी,नायगाव, पिठी, बेलेवाडी, पाटोदा, दासखेड, पाचेगाव, पाचांग्री ता. पाटोदा कडा गट, धानोरा ता.आष्टी मतदारसंघातील गावकऱ्यांशी विविध प्रश्नावर चर्चा करत असताना, निवडणुकी संदर्भात जनतेची मते जाणून घेतली जनतेतूनही उत्सपूर्त प्रतिसाद दिसत असल्याचे त्यांनी सांगितले ते पक्षाचे लिगल सेल चे प्रदेश उपाध्यक्ष म्हणून काम पाहत असून त्यांचं पक्षासाठी असलेले योगदान तसेच लिगल सेल माध्यमातून त्यांच्या मतदार संघातच संपूर्ण महाराष्ट्रात गाजलेल्या अनेक जनहितार्थ याचिका आहेत. ते मराठवाड्यात पक्षाची कायद्याची बक्कम सांभाळत आलेले आहेत. २०२३ मध्ये ते उच्च न्यायालयाचे अध्यक्ष असताना २०० वकिलांची टीम मनोज जरांगे पाटलांना यांच्या आरक्षणाला पाठिंबा घेऊन गेले होते. नुकत्याच पाटोदा शहरात झालेल्या पक्षाच्या शिवस्वराज्य यात्रेत त्यांनी चांगलेच भाषण गाजवले होते.



## मागासवर्गीय वार्डात घाणीचे साम्राज्य ; बॅनरवर चपलांचा हार लाऊन केज नगरपंचायत व कन्स्ट्रक्शनचा केला निषेध !

**केज । प्रतिनिधी**

केज नगरपंचायतची सत्ता जनविकास परिवर्तन आघाडी व कॉंग्रेस मिळुन स्थापन झालेली आहे . जनविकास परिवर्तन आघाडीचे हारुण इनामदार हे केज शहरामध्ये भाजपाचे काम मागील ०९ वर्षा पासून पाहतात . यावेळी लोकसभेला देखील निवडणुकीचे शहरातील कामकाज त्यांनीच पाहिले होते.मागील न.प केजच्या निवडणुकीत शहरातील वार्ड क्रमाक ७ मधुन कपिल मस्के तसेच विमल जोगदंड यांचा पराभव करून सौ. सिता बनसोड या मोठया मताधिक्याने निवडणून आल्या आणि नगराध्यक्ष पदावर विराजमान झाल्या. परंतु नगराध्यक्ष पदाचा प्रत्यक्षात कारभार मात्र हारुन इनामदार हेच पाहत असल्याची चर्चा शहारातील जनतेकडून ऐकावयास मिळत आहे. तसेच केज विधानसभेच्या भाजपाच्या आमदार सौ. नमिता मुंदडा या मागासवर्गीय समाजातून येतात तसेच नगराध्यक्षा सौ.सिता बनसोड या देखील मागासवर्गीय समाजाच्या आहेत मात्र मागासवर्गीय वार्डाचा तसेच केज शहरातील विकासासाठी त्या उदासिन असताना पहावयास मिळत आहेत.




याबाबत सविस्तर वृत्त असे केज शहरात एकुण १७ वार्ड आहेत त्यापैकी वार्ड क्र. ७,९ व १६ मागासवर्गीय वार्ड म्हणून आरक्षीत आहेत. परंतु सदरील वार्डात घाणीचे साम्राज्य तसेच सत्ताधाऱ्यांची विकासासाठी उदासीनता दिसून येत आहे. त्यापैकी वार्ड क्र.१६ मध्ये नगरसेविका सौ. पल्लवी ओंमप्रकाश राजणकर या मोठया मताधिक्याने निवडणुन आल्या होत्या त्या निवडून आल्या मात्र त्यांना सत्ताधारी कसल्याच प्रकारे विश्वासात न घेता तथा मागासवर्गीय वस्तीत निधी न देता तसेच स्वच्छतेच्या संदर्भाने वार्डातील कामे सांगितले असता सत्ताधारी उदासिनता दाखवत असल्यामुळे वार्डात सर्वदूर दुर्गंधी , घाणीचे साम्राज्य परसले असल्याची प्रतिक्रिया दैनिक वादळ वार्ताच्या प्रतिनिधीशी बोलतांना त्यांनी दिली आहे. मात्र सदरील वार्ड क्र.१६ च्या समस्या डोके वरती काढत असल्यामुळे याकडे कॉंग्रेसचे शहराध्यक्ष ताहेर खुरेशी यांनी प्रशासनास तथा सत्ताधाऱ्यास जागे करण्यासाठी आगळे-वेगळे अंदोलन उभे केले आहे. चक्क घाणीच्या व दुर्गंधीयुक्त ठिकाणी एक बॅनर लावले असुन त्यावर केज नगरपंचायत व यश कन्स्ट्रक्शन यांची नावे लिहुन या नावावर चंपालाचा हार घातला आहे. या अनोख्या पद्धतीने लावलेल्या बॅनरची चर्चा शहरात सर्वदुर होताना दिसत आहे. सदरील लावलेल्या बॅनरमुळे केज नगरपंचायतचे सत्ताधारी तथा विरोधक जागे होतील का ? मागासवर्गीय वस्तीला न्याय मिळेल का ? नगसेविका सौ. पल्लवी ओंमप्रकाश राजणकर यांच्या मागासवर्गीय वस्तीतील कामे होतील का ? आदि प्रश्न शहरातील जनतेला पडली आहेत.

# स्व जिल्ह्यातील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन केल्यानंतरच आंतरजिल्हा बदलीने आलेल्या शिक्षकांना पदस्थापना देण्याची अतिरिक्त शिक्षक संघर्ष समितीची मागणी

**अंबाजोगाई (प्रतिनिधी**

बीड जिल्हा परिषदेने नुकतीच गणित-विज्ञान विषय शिक्षकांची प्राथमिक पदवीधरपदी पदोन्नती केली असून या पदोन्नतीमुळे जिल्ह्यात रिक्त झालेल्या जागी यापूर्वीच अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन प्रथम करण्याची मागणी अतिरिक्त शिक्षक संघर्ष समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

सन 2022-23 व 2023-24 या दोन वर्षाच्या संच मान्यतेनुसार बीड जिल्ह्यात एकूण 296 मुळ सेवाज्येष्ठ शिक्षक अतिरिक्त ठरलेले आहेत. तसेच मागील दोन तीन महिन्यांपासून आंतरजिल्हा बदलीने बीड जिल्हा परिषदेला जवळपास 50 शिक्षक रुजू झालेले आहेत. नुकतीच बीड जिल्हा परिषदेने शिक्षक पदोन्नतीची प्रक्रिया राबवली असल्याने रिक्त झालेल्या पदावर पहिल्यांदा स्व जिल्ह्यातील अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन करण्यात यावे व त्यानंतरच आंतर जिल्हा बदलीने बाहेरील जिल्हा परिषदांमधून आलेल्या शिक्षकांच्या पदस्थापनेची प्रक्रिया राबविण्यात यावी. जेणेकरून स्व जिल्ह्यातील मूळसेवाजेष्ठ व अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांवर अन्याय होणार नाही मात्र जिल्हा परिषदेमध्ये सध्या सुरू असलेल्या हालचालीवरून असे जाणवत आहे की आंतरजिल्हा बदलीने आलेले शिक्षक गैरमार्गाचा अवलंब करून समायोजनाच्या अगोदर स्वतःला मोक्याच्या जागी पदस्थापना कशा मिळवता येतील या दृष्टीने प्रयत्न करत असल्याचे दिसून येत आहे. खरे तर शासन निर्देशानुसार आंतरजिल्हा बदलीने आलेल्या शिक्षकांना ते ज्या आठवड्यात जिल्हा परिषदेत रुजू झाले त्या आठवड्यातील मंगळवारी पदस्थापना देण्याचे शासनाचे निर्देश असतांना व जिल्ह्यात जागा रिक्त असतांनाही आतापर्यंत जिल्हा परिषदेने त्यांना पदस्थापना दिलेल्या नाहीत मात्र आता पदोन्नती प्रक्रियेमुळे जागा रिक्त झाल्याने हे शिक्षक आपल्याला मोक्याच्या जागा मिळाव्यात म्हणून कामाला लागल्याचे दिसत आहे. जिल्हा परिषद प्रशासनाने असा प्रकार करू नये. सन 2018 च्या समायोजनाबाबतच्या शासन निर्देशानुसार अगोदर अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन करावे व मगच आंतर जिल्हा बदलीने आलेल्या शिक्षकांच्या पदस्थापनेची प्रक्रिया राबवावी अन्यथा अतिरिक्त शिक्षक संघर्ष समिती तीव्र आंदोलन करण्याच्या पावित्र्यात असून वेळ प्रसंगी न्यायालयात दाद मागण्याचीही तयारी संघर्ष समितीने केली असल्याचे निवेदन संघर्ष समितीच्या वतीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात येणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com